**MHST090000581995**

## नियमित दिवाणी दावा क्र. १०/१९९६ मधील निशाणी १३७ खालील आदेश.

वादीने सदरील अर्ज दाखल करुन असे कथन केले की सदरील दावा हा दावा मिळकतींचे उलटून खरेदीपत्र करुन मागण्यासाठी या न्यायालयामध्ये दाखल केलेला आहे. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दावा वादीचा उर्वरीत उलटतपासासाठी नेमण्यात आलेला आहे. या कामी वेगवेगळया कारण्यावरून मयत प्रतिवादी व त्यांचे वारस यांना मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्याकडे पकरणे दाखल केली होती. त्या कारणामुळे वादीने मुंबई येथील वकीलांकडे कागद दिले होते. सदर कागदपत्रांची पडताळणी केली असता दिनांक १८/०६/१९७३ च्या खरेदीपत्रानंतर दावा मिळकतीपैकी १५ आर ऐवजी ९ आर क्षेत्र धोम कालव्यासाठी संपादीत केल्याचे वादीच्या प्रथम लक्षात आले. त्या अनुषंगाने दावा कलम १ यात १/३ हिस्सा या शब्दानंतर घातपात करुन याचे क्षेत्र ४१.६६ आर असे लिहण्यास परवानगी मिळावी. तसेच वाद मिळकतीच्या १५ येथील १५ या अंकास काट देवून त्या ऐवजी ९ असे अंक लिहण्यास परवानगी मिळावी असा अर्ज वादीने दाखल केलेला आहे.

२. वादीने पुढे असे कथन केले आहे की मूळ दाव्यात नजर चुकीने ९ आर ऐवजी १५ आर असे नमुद केले आहे. यामुळे वादी मागत असलेली दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची आहे. त्यामुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही. वादी व प्रतिवादी यांच्यातील वादाचे निराकरण करण्यासाठी सदर दुरुस्ती योग्य व प्रामाणिकपणाची आहे. सदरील दुरुस्तीमुळे प्रतिवादीच्या म्हणण्याला कोणतीही बाधा येणार नाही. प्रस्तुतचा दावा १९९६ चा आहे. त्यामुळे सुधारीत तरतूदीचा अंमल या अर्जास लागू होणार नाही. यामुळे वादीचा अर्ज मंजूर होवून वादीला सदरील दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्यासाठी

वादीने विनंती केली आहे.

३. प्रतिवादीने सदरील अर्जावर निशाणी १३९ अन्वये त्याचे म्हणणे दाखल केले व असे कथन केले की वादीचा अर्ज हा लबाडीचा ,खोटा आहे व वादीने सदरील दुरुस्ती करता दिलेले कारण हे खोटे आहे. व ते प्रतिवादींना मान्य नाही. प्रतिवादीने पुढे असे कथन केले की १५ आर ऐवजी ९ आर क्षेत्र धोम कालव्यासाठी संपादीत झाल्याचे वादीस कधी समजले याबाबत वादीने अर्जात नमुद केलेले नाही. सदरील दुरुस्ती ही दाव्याचे स्वरुप बदलते. सदरील दुरुस्ती हि दाव्यामधील उणीवा भरुन काढण्याचे वादी प्रयत्न करत आहे. सदरील दुरुस्ती तांत्रीक स्वरुपाची नाही.सदरील अर्ज हा वादीने दाव्याचे काम लांबणीवर टाकण्यासाठी दिला आहे.

४. प्रतिवादीने पुढे असे कथन केले की वादीचा पुरावा फार वर्षापूर्वीबंद झाला आहे. दुरुस्ती बदल केल्यास वादी तोंडी पुरावा देईल. सदरील दुरुस्ती हि वादीचे व प्रतिवादीमधील वाद निवारण करण्याकरीता आवश्यक नाही. वादीला वाद मिळकतींमधील किती क्षेत्र धोम कालव्यासाठी संबोधित झाले याची माहिती होती. इतक्या उशिराने वादीने दुरुस्ती अर्ज का दाखल केला याचे संयुक्तीक कारण नाही त्यामुळे वरील बाबी विचार करता सदरील दुरुस्ती अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादीने केली आहे.

५. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला.

६. पटलावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की सदर दावा हा १९९६ सालचा असून तो २५ वर्षापेक्षा जास्त जुना आहे. सदरील प्रकरणामध्ये वादीने त्याचा पुरावा बंद केला आहे. सदरील प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाअन्वये वादीचा उलटतपास घेणे करीता सदरील प्रकरण नेमलेले आहे. प्रकरणामध्ये वादीने त्याच्या दाव्यासोबत सदरील वाद मिळकतीचा सातबारा उतारे दाखल केला. सदरील सातबारा उता–याचे अवलोकन केले असता या ठिकाणी असे दिसून येते की सदरील धोम कालव्यासाठी ९ आर क्षेत्र संपादीत झाले होते. त्याचप्रमाणे वादीने त्याच्या दाव्यामध्ये सिटीसव्हे नंबर १०७०/२+५ + क +३क्षेत्र १ हेक्टर ३४ आर आकार ४

रु. ४४ पै. यापैकी दक्षिणेकडील सामाईकात १/३ हिस्सा असे दावा मिळकत म्हणून नमूद केले होते व सदरील जमीनीतील १५ आर क्षेत्र धोम कालव्याकरता संपादीत केल्याचे स्पष्ट होते. या ठिकाणी कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादीने दाखल केलेली दुरुस्ती म्हणजे १/३ हिस्सा म्हणजे ४१.६६ आर क्षेत्र व वादीने नमूद केलेला धोम कालव्यासाठी संपादीत केलेला १५ आर क्षेत्र ऐवजी ९ आर क्षेत्र हि दुरुस्ती या ठिकाणी दाव्याच्या गुणदोषावर निकाली लावण्याकरीता पटलावर येणे आवश्यक आहे. वादीचा दावा हा सन १९९६ सालचा असल्याचे दिसून येते. सदरील दावा हा मा.उच्च न्यायालयाने नोव्हेंबर २०२५ पर्यंत संपविण्याचा निर्देश दिल्याचे देखील दिसून येते. करीता वरील बाबींचा विचार करुन सदरील दावा गुणदोषावर निकाली काढण्याकरीता व प्रकरणाची गुंतागुंत टाळण्याकरता वादीने सदरील दुरुस्ती कारणे आवश्यक असल्याचे या ठिकाणी दिसून येते तरी वादीचा अर्ज मंजूर करण्यात येवून वादीला अर्जात मागितलेली दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. निशाणी १३७ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने अर्जात नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती करुन दावा दुरुस्त प्रत दयावी.

PUSHPLATA DHONDIRAJ YAVATKAR
Digitally signed by PUSHPLATA DHONDIRAJ YAVATKAR
Date: 2025.10.08 17:58:21 +0530

कोरेगाव. (पी.डी.यवतकर)

दि. ०६/१०/२०२५ दिवाणी न्यायाधीश क. स्तर कोरेगाव.